# ‘केव्हीके’तर्फे कौशल्य विकास मेळावा

**गोंदिया (प्रतिनिधी) :** कृषी विज्ञान केंद्र, महिला आर्थिक विकास महामंडळाअंतर्गत कौशल्य उद्योजकता मेळाव्याचे आयोजन येथील जलाराम लॉन परिसरात करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार गोपालदास अग्रवाल होते.

जिल्हा परिषद अध्यक्षा सीमा मडावी, लीड बॅंकेचे व्यवस्थापक शिराळे, कृषी व पशुसंवर्धन सभापती सैलजा सोनवाणे, कार्यक्रम समन्वयक डॉ. एस. एन. देशमुख, हिवरा कृषी विज्ञान केंद्राचे गणेश खेडीकर यांची या वेळी उपस्थिती होती.

बॅंकांनी बचत गटांना आधार देण्याची गरज आहे. सुलभ पद्धतीने कर्ज उपलब्ध करून दिल्यास बचत गट सक्षम होण्यास हातभार लागेल, असे मत अग्रवाल यांनी व्यक्त केले. ज्या महिलांनी स्वयंसहायता समूहांनी शेळीपालन, पशुपालन, कुक्कुटपालन असे व्यवसाय निवडले आहेत; त्यांनी पशुधनाचे व्यवस्थित संगोपन करावे, त्यांच्या लसीकरणावर भर द्यावा, जनावरांचा गोठा निर्जुंतूक ठेवावा, असे डॉ. देशमुख यांनी सांगीतले. या वेळी उज्वला योजनेतील लाभार्थ्यांना गॅसचे वितरण करण्यात आले.